# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.08.2025** **वार- शनिवार**

---

**संरक्षण क्षेत्र निर्यात**

देशाचा संरक्षण क्षेत्रातील निर्यात गेल्या वर्षी २३ हजार कोटी रुपये इतकी होती, येत्या दोन ते  तीन वर्षांत ती दुप्पट होईल असा विश्वास संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव आणि DIAT चे शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

पुण्याच्या डिफेन्स इन्स्टिटट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी अर्थात DIAT चा १४ वा पदवीदान समारंभ कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

भारतीय संरक्षण सामग्रीला मध्य पूर्वेकडील देश, आफ्रिका आणि दक्षिण आशियाई देशांमध्ये मागणी असल्याचं त्यांनी सांगितलं.

**अग्निशमन केंद्र**

जिल्ह्यात आज राखी पौर्णिमेचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पिंपरी येथील मुख्य केंद्रातील जवानांना, चिखली येथील इनोव्हेशन वर्ल्ड स्कूल या शाळेच्या इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनींनी राख्या बांधून राखी पौर्णिमा साजरी केली. यावेळी मुलांना अग्निशमन दलातील जवानांच्या कामाची, त्यांच्या धाडसाची माहिती देण्यात आली.

**जवानांना राखी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी लेह लडाखमधील आपल्या वीर जवानांसाठी स्वतः हाताने राख्या तयार करून पाठवल्या आहेत. हा उपक्रम आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, यांच्या संकल्पनेतून आणि शाळेच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला आहे.

**आदिवासी दिन**

आदिवासी समुदायाच्या ऐतिहासिक योगदानाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी कार्यक्रमात बोलताना म्हणाले की, आदिवासी समुदायाचं देशाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय जडणघडणीत तसंच स्वातंत्र्य लढ्यातही मोलाचं योगदान आहे.

आदिवासी संस्कृतीच्या जतन आणि संवर्धनासाठी विद्यापीठ लवकरच 'राईज फाउंडेशन' सोबत सामंजस्य करार करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**क्रांती दिन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आज क्रांतीदिनानिमित्त चिंचवड येथील हुतात्मा चापेकर बंधूंच्या समूह शिल्पास, थोर क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास तसंच दापोडी इथल्या शहीद भगतसिंग आणि शहीद नारायण दाभाडे यांच्या पुतळ्यास उप-आयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

**शिधापत्रिका रद्द**

गेल्या सहा महिन्यांपासून अंत्योदय तसंच प्राधान्य योजनेतून धान्य न उचलणाऱ्या शिधापत्रिकांवरील धान्य बंद करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले असून यामुळे शिल्लक राहणारे धान्य प्रतीक्षा यादीवरील शिधापत्रिकाधारकांना देण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील अशा सुमारे ३ लाख ३३ हजार ८८१ शिधापत्रिकांवरील धान्य गेल्या सहा महिन्यांपासून उचलले गेले नसल्याचे राज्य शासनाने निदर्शनास आणून दिले आहे.

या शिधापत्रिकाधारकांचे धान्य बंद केले असले, तरी त्यांची शिधापत्रिका रद्द होणार नाही. त्यांनी धान्याची मागणी केल्यास शिधापत्रिका पुनरुज्जीवित करून पुढील महिन्यात त्यांना धान्य देण्यात येईल असे पुणे अन्नधान्य वितरण अधिकारी प्रशांत खातळ यांनी सांगितले.

## विश्वबंधुता साहित्य संमेलन

बंधुता मूल्यातून एकोप्याची भावना, सुदृढ समाजाची निर्मिती होत असते. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये बंधुत्व मूल्याचे महत्व रुजण्यासाठी प्रयत्नशील असावे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.

विश्वबंधुता साहित्य परिषद आणि रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालय यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या बाराव्या विश्वबंधुता विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. मेनकुदळे यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते.

## बांधकाम कारवाई

कोंढवा खुर्द परिसरामधील अनधिकृत बांधकामावर पुणे महापालिकेच्या विशेष पथकाने आज कारवाई केली. कोंढवा खुर्द पार्कमधीन नऊ मजल्याच्या इमारतीवर ही कारवाई करण्यात आली. यामध्ये ५ हजार चौरस फूट बांधकाम पाडण्यात आलं.

## रेशीम अभियान

केंद्रीय रेशीम मंडळ अंतर्गत संपूर्ण भारतभर "मेरा रेशम मेरा अभिमान" अभियान राबविले जात असून त्याचाच एक भाग म्हणून नुकतेच जिल्हा रेशीम कार्यालय पुणे आणि केंद्रीय रेशीम मंडळ बारामती यांनी संयुक्तपणे रेशीम कार्यशाळेचे आयोजन केले होते.

आंबेगाव गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत उपस्थितांना रेशीम शेतीविषयी मार्गदर्शन करण्यात आलं. या अभियानामुळे रेशीम शेती उद्योग वाढीस निश्चितच गती मिळेल. आंबेगाव तालुक्यात रेशीम शेती उद्योगाच्या वाढीस मोठा वाव असून रेशीम उद्योग सुरू करण्यासाठी शासकीय अनुदान उपलब्ध असल्यानं शेतकऱ्यांनी रेशीम शेती करण्यासाठी पुढे यावं असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. उद्याही ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**